२
महाराष्ट्र टाइम्स मरिन ड्राइव्ह point

शनिवार, २६ फेब्रुवारी २०११

# तुमच्या वास्तूसाठी

**यशश्री बुधकर**

वास्तूशास्त्र आणि फेंगशुई यांची क्रेझ सध्या खूप झपाट्याने वाढत आहे. वेगवेगळी पुस्तकं आणि टीव्हीवर खास या विषयावरचे कार्यक्रम पाहायला मिळतात आणि वाचायलाही मिळतात. पण हे सर्व पाहून आणि वाचून आपले प्रश्न वाढतच जातात. कारण याची कुठेच सविस्तर माहिती सांगितली जात नाही. पण हल्लीच प्रकाशित झालेलं 'आदर्श घराची संकल्पना' हे वास्तूशास्त्रावर आधारित पुस्तक खूपच वाचनीय आहे. या पुस्तकाचे लेखक आहेत वास्तूतज्ज्ञ डॉ .तुषार यशवंत सावडावकर!




पुस्तक वाचताना एकंदर असं लक्षात येतं की वास्तूशास्त्राचा सखोल अभ्यास करून हे पुस्तक लिहिलेलं आहे. त्यात अध्यात्माला वैज्ञानिक आणि शास्त्रीय कारणांची झालर लावून वास्तूबद्दलचं ज्ञान सोप्या शब्दात सांगितलेलं आहे.

खास कौतुकास्पद गोष्ट म्हणजे फोटोमधून सांगण्याची पद्धत उल्लेखनीय वाटली.

लेखकाला जे सांगायचं आहे ते या चित्रांमुळे खूप सोपं झालं आहे. कित्येक वेळेला आपण बाहेर फिरायला, प्रवासासाठी जातो तेव्हा कोणतीही प्रतिकात्मक चित्रं किंवा यंत्र आपण आवडीने विकत घेतो. पण त्याच्या दिशांचं महत्त्व आपल्याला माहीत नसतं. अज्ञानाने आपण ती प्रतिकात्मक चित्रं शो-पीस म्हणून घरातल्या कोणत्याही भिंतीवर लावतो. पण त्यांचे उलटे परिणाम आपल्याला भोगावे लागतात. असे प्रकार टाळण्यासाठी डॉ. तुषार यांनी या यंत्रांची दिशा आणि महत्त्व विस्तृतपणे समजावून सांगितलेलं आहे.

होकायंत्राचा वापर कसा करावा तसंच रंगशास्त्र ऑरा, समुद्रमीठ याची माहिती आणि यज्ञविधी कसे करावेत याबद्दल सांगितलं आहे. आपणच आपल्या घरात सुख-शांती, आरोग्य आणि समृद्धी सहजपणे आणू शकतो, ती कशी याची माहिती लेखकाने सविस्तरपणे सांगितली आहे.

'वास्तूपुरुष मंडल' या भागात लेखकाने वास्तू आणि वास्तूचा अधिपती याचं जे सविस्तर वर्णन केलेलं आहे, ते खरंच वाचनीय आहे आणि मोलाचं आहे. कारण आपण सर्वांनीच नवीन घर घेतलेलं असतं. त्यावेळी वास्तूशांतीही केली असते किंवा भटजींच्या सांगण्यावरून वास्तू पुरुषाची प्रतिमा आपण आपल्या घरात पुरतो. पण असं करण्यामागे याचा अर्थ आपल्यापैकी कोणालाच माहीत नसतो. पण डॉ. तुषार यांनी वास्तू पुरुषाबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. जमिनीची शुद्धी कशी करावी किंवा घराच्या प्लॉट्सचे किंवा फ्लॅट्सचे आकार चित्रासकट व्यवस्थित समजावण्याचा लेखकाचा प्रयत्न यशस्वी झाला आहे.

स्त्रियांची घरातली आवडती जागा म्हणजे स्वयंपाकघर! ते कोणत्या दिशेला असावं आणि कसं असावं याची माहिती नीट सांगितली आहे. स्वयंपाकघर कुठे असावं आणि एखाद्या दिशेला लाभदायक नसेल तर ते कुठं असावं, या अनेक प्रश्नांची उत्तरं या पुस्तकात मिळतात.

आम्ही एवढं कमावतो, मग पैसा जातो कुठे, हा प्रश्नही अनेकांना सतावतो. मग तुमची तिजोरी कुठे ठेवली आहे, हे शोधून काढा आणि पुस्तकात दिलेल्या तिजोरीची जागा तुमच्या तिजोरीच्या जागेशी मेळ घेते का बघा. मग तुम्हाला तुमचा पैसा कुठे जातो, याचं उत्तर मिळेल. तुमच्या जीवनातल्या अनेक नेहमीच्या प्रश्नांची उत्तरं तुम्हाला या पुस्तकात मिळतील.

पुस्तक वाचताना एखाद-दुसरी गोष्ट खटकते ती म्हणजे पाण्याचं स्थान आग्नेयला अशुभ आहे, पण मग पाण्याचा इलेक्ट्रिक पंप त्या दिशेला शुभ कसा, हे गणित कोड्यात टाकणारं आहे. कारण पाणी आणि त्याची मोटार ही अंतराने जवळच असणार. पुढल्या आवृत्तीत याचं व्यवस्थित वर्गीकरण करून लेखकाने मांडावं. पण अशा थोड्याशा त्रुटी सोडल्या तर हे पुस्तक तुमची वास्तू समजण्यासाठी आणि त्यात फायदेशीर बदल घडवून आणण्यासाठी मार्गदर्शन करणारं आहे.

**आदर्श घराची संकल्पना**
**लेखक : डॉ. तुषार यशवंत सावडावकर**
**पृष्ठ : १६६, किंमत : ३९९ रु.**

mtartedit@gmail.com